ePaper
एसआरएप्रकरणी किशोरी पेडणेकरांची अडचण वाढणार?, सोमय्यांकडून पुन्हा इशारा



| वर्ष - 6 | अंक - 196 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज TM

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- भूमिगत कालव्याचा अहवाल लवकरच राज्य सरकारकडे
- शेर अकेला ही काफी है।
- महाराष्ट्राचे औद्योगिक- आर्थिक नुकसान

www.mahaenews.com | रविवार | दिनांक 30 ऑक्टोबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# ‘ठाणेदार’ शिक्षकांना ‘छडी’ !

## बदल्या करण्याचा निर्णय : अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळेंचा दणका






> महापालिकेच्या 5 शाळांना भेटी दिल्या आहेत. शाळेतील विद्यार्थ्यांना दर्जेदार सेवा-सुविधा देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. काही शाळांमध्ये एकाच ठिकाणी 8 ते 10 वर्ष काही शिक्षक नोकरी करत आहेत. मात्र, एकाच ठिकाणी जास्त नोकरी केल्याने त्यांची त्या शाळेत मक्तेदारी निर्माण होत आहे. अशा शिक्षकांच्या बदल्या करण्याची मागणी होत आहे. त्यानुसार एकाच ठिकाणी ठाण मांडलेल्या शिक्षकांच्या बदल्याचे नियोजन करण्यात येत आहे.
>
> **- प्रदीप जांभळे-पाटील,** अतिरिक्त आयुक्त

**| पिंपरी |**
**| महाईन्यूज | प्रतिनिधी|**

पिंपरी-चिंचवड महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांची गुणवत्ता सुधारण्यासाठी भर देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी, बौध्दिक पातळीचाही अभ्यास केला जाणार आहे. तसेच अनेक वर्षांपासून एकाच शाळेत ठाण मांडलेल्या शिक्षकांच्या बदल्या करण्यात येणार असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे यांनी दिली.

शहरात महापालिकेच्या प्राथमिक, माध्यमिक शाळा आहेत. महापालिकेच्या शाळांच्या दर्जा सुधारण्यासाठी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी लक्ष घातले आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात 10 शाळा मॉडर्न करण्याचा पालिकेचा मानस आहे. तसेच पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनीही पालिका शाळेतील पटसंख्या आणि गुणवत्तेकडे लक्ष देण्याची सूचना केली आहे.

दरम्यान, शिक्षक संघटनांच्या विविध प्रश्नांसंदर्भात संघटना महापालिकेत संघटनांचे प्रतिनिधी येतात. अतिरिक्त आयुक्त जांभळे यांनी शिक्षक संघटनांसोबत महिन्यातून एकदाच बैठक घेण्याचे नियोजन केले आहे.

# पोलीस बांधव, सफाई कामगारांसोबत दिवाळी

## कुंदाताई भिसे यांचा आदर्श : उन्नती सोशल फाउंडेशनचा पुढाकार

**| पिंपरी |**
**| महाईन्यूज | प्रतिनिधी|**

> **कुंदाताई भिसे म्हणाल्या, पिंपळे सौदागरवासीयांच्या आरोग्यासाठी सफाई कामगार अविरतपणे सेवा देत आहेत. कोरोना काळातही त्यांनी जीवाची बाजी लावून या सेवा पुरविल्या. या कर्मचाऱ्यांच्या योगदानाने नागरिकांचे आरोग्य जपले जात आहे. कर्तव्यदक्ष पोलीस बांधवांच्या योगदानामुळेच आज आपले शहर सुरक्षित आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांच्या अखंड सेवेबद्दल त्यांचा दिवाळीनिमित सन्माना करण्यात आला. तसेच त्यांना अनोख्या पद्धतीने दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.**




वर्षभर सार्वजनिक स्वच्छतेची सेवा देऊन पिंपळे सौदागरकरांचे आरोग्य जपणारे आरोग्य विभागातील आरोग्यसेवक, सफाई कर्मचारी तसेच २४ तास सतत कर्तव्य बजावून सामजिक शांतता प्रस्थापित करणाऱ्या पोलीस बांधवांना दिवाळीनिमित भेट देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. सन्मानपूर्वक मिळालेल्या दिवाळी भेटीने पोलीस बांधव आणि आरोग्य कर्मचारी, सफाई कामगार भारावले होते.

उन्नती सोशल फाऊंडेशन आणि भारतीय जनता पार्टी, चिंचवड विधानसभा महिला मोर्चाच्या अध्यक्षा सौ. कुंदाताई भिसे यांच्या पुढाकाराने पिंपळे सौदागर येथील महिला आरोग्य कर्मचारी, सांगवी पोलीस, वाहतूक विभागातील पोलीस कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष भेटून दिवाळीच्या शुभेच्छा देत सुखाचे चार क्षण पेरण्यात आले. कुंदाताई भिसे म्हणाल्या, पिंपळे सौदागरवासीयांच्या आरोग्यासाठी सफाई कामगार अविरतपणे सेवा देत आहेत. कोरोना काळातही त्यांनी जीवाची बाजी लावून या सेवा पुरविल्या. या कर्मचाऱ्यांच्या योगदानाने नागरिकांचे आरोग्य जपले जात आहे. कर्तव्यदक्ष पोलीस बांधवांच्या योगदानामुळेच आज आपले शहर सुरक्षित आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांच्या अखंड सेवेबद्दल त्यांचा दिवाळीनिमित सन्माना करण्यात आला. तसेच त्यांना अनोख्या पद्धतीने दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

# भूमिगत कालव्याचा अहवाल लवकरच राज्य सरकारकडे!

## खडकवासला धरणातून नवीन मुठा कालव्यातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याची चोरी

।पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

### प्राथमिक आराखडा निश्चित

**७.८० मीटर रूंद, ३.९० मीटर उंच आणि १.९५० मीटर गोलाकार उंच अशा आकाराच्या बोगद्यातून खडकवासला ते फुरूसुंगी दरम्यान बोगद्यातून पाणी नेण्याचा प्राथमिक आराखडा निश्चित करण्यात आला आहे. या बोगद्यामुळे कालव्याची क्षमता १५१० क्युसेक होणार असून ते सर्व पाणी गुरुत्वाकर्षणाने फुरसुंगीपर्यंत नेण्यात येणार आहे.**



खडकवासला धरणातून नवीन मुठा कालव्यातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याची चोरी, बाष्पीभवन, गळती यावर उपाय म्हणून शहरातून वाहणारा हा कालवा भूमिगत करण्याचा प्रस्ताव आहे. या प्रकल्पासाठीच्या माती परीक्षणाचे काम पूर्ण झाले असून बोगद्याचा आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे. लवकरच याबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) मान्यतेसाठी शासनाकडे पाठविला जाणार आहे. या प्रकल्पाचा डीपीआर तयार करण्याच्या सूचना राज्य शासनाने दिल्या आहेत. त्यानुसार निविदा मागवून एका खासगी कंपनीला हे काम देण्यात आले. या प्रकल्पाचा डीपीआर तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यासाठी ज्या मार्गाने बोगदा जाणार आहे, त्या मार्गावरील जमिनींची (मृदा) तपासणी करण्याचे काम पूर्ण झाले आहे. त्यासाठी प्रत्येक अर्धा किलोमीटर अंतरावर बोअर खोदण्याचे काम हाती घेण्यात आले होते. आता पुढच्या टप्प्यात या प्रकल्पाचे आरेखन आणि अंदाजपत्रक तयार करण्याचे काम सुरू आहे. सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून तो मान्यतेसाठी जलसंपदा विभागाकडून शासनाकडे पाठविला जाणार असल्याचे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले.

दरम्यान, खडकवासला धरण ते फुरसुंगी या दरम्यान २५ किलोमीटर लांबीच्या बोगद्यातून पाणी नेण्याच्या कामासाठी दीड हजार कोटी रुपये खर्च येणार आहे. साधारणत: एक अब्ज घनफूट (टीएमसी) क्षमतेचे धरण बांधण्यासाठी भूसंपादन आणि प्रत्यक्ष धरण उभारणे यासाठी एक हजार कोटींचा खर्च येतो. यानुसार अडीच टीएमसी क्षमतेचे धरण बांधण्यासाठी तीन हजार कोटी रुपये लागू शकतात. मात्र, बोगद्यातून पाणी नेणे हा प्रकल्प आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य असल्याचेही जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले.

---

# डीपीसी'साठी निधीवाटपाचे भाजप-बाळासाहेबांची शिवसेनेचे सूत्र निश्चित ?

## चालू आर्थिक वर्षातील जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) कामांतील फेरबदल



**कामे अंतिम करताना भाजप आणि बाळासाहेबांची शिवसेना यांनी आपापसात विकासकामांसाठी निधी वाटपाचे सूत्र निश्चित केले आहे. त्यानुसार भाजपचे प्रभुत्त्व असलेल्या परिसरात ६० टक्के आणि बाळासाहेबांची शिवसेनेचे वर्चस्व असलेल्या भागात ४० टक्के विकासनिधी देण्याचे ठरविण्यात आले आहे. नुकत्याच झालेल्या डीपीडीसी बैठकीनंतर यापूर्वीच्या मंजूर केलेल्या १०५८ कोटी रुपयांच्या आराखड्यातील कामांची फेरतपासणी करण्याचे स्पष्ट करून पालकमंत्री पाटील यांनी कामांत फेरबदल करण्याचे सूतोवाच केले होते.**

।पुणे। महाईन्यूज ।

चालू आर्थिक वर्षातील जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) कामांतील फेरबदल अंतिम टप्प्यात आले आहेत. पुढील आठवड्यात राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडून कामे अंतिम करून ती जाहीर केली जाणार आहेत. कामे अंतिम करताना भाजप आणि बाळासाहेबांची शिवसेना यांनी आपापसात विकासकामांसाठी निधी वाटपाचे सूत्र निश्चित केले आहे. त्यानुसार भाजपचे प्रभुत्त्व असलेल्या परिसरात ६० टक्के आणि बाळासाहेबांची शिवसेनेचे वर्चस्व असलेल्या भागात ४० टक्के विकासनिधी देण्याचे ठरविण्यात आले आहे. नुकत्याच झालेल्या डीपीडीसी बैठकीनंतर यापूर्वीच्या मंजूर केलेल्या १०५८ कोटी रुपयांच्या आराखड्यातील कामांची फेरतपासणी करण्याचे स्पष्ट करून पालकमंत्री पाटील यांनी कामांत फेरबदल करण्याचे सूतोवाच केले होते. त्यानुसार कामे अंतिम करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांच्या कार्यालयात लगबग सुरू आहे. कामांत फेरबदल करताना भाजप आणि बाळासाहेबांची शिवसेना यांना अनुक्रमे ६० टक्के आणि ४० टक्के असे सूत्र निश्चित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील भाजप आणि बाळासाहेबांची शिवसेना यांच्या पदाधिकाऱ्यांनी सुचवलेल्या कामांचा समावेश करण्यात आला आहे. पुढील आठवड्यात पालकमंत्री पाटील कामे अंतिम करून ती जाहीर केली जाणार आहेत.

दरम्यान, जिल्ह्याचा चालू आर्थिक वर्षाचा तब्बल १०५८ कोटींचा आराखडा आहे. त्यापैकी केवळ २० टक्के निधी आतापर्यंत खर्च झाला आहे. उर्वरित निधी खर्च करण्यासाठी तातडीने कामे मंजूर करणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्यास आचारसंहितेमुळे डीपीसीमधील कामे थांबण्याची शक्यता असल्याने ही कामे तातडीने अंतिम करणे आवश्यक आहे. त्यामुळे अंतिम केलेली कामे जाहीर करून तातडीने कामांना सुरुवात करण्यात येणार आहे.

---

# मोटारींच्या प्रतिकृतींची निराळी दुनिया

## रत्नाकर जोशी यांच्या छंदाचे प्रदर्शन

।पुणे ।महाईन्यूज ।



अगदी काडेपेटीच्या आकारापासून ते तीन फूट लांबीच्या विविध आकारांतील मोटारींच्या प्रतिकृतींची निराळी दुनिया रत्नाकर जोशी या छांदिष्टाच्या संग्रहातून अवतरली आहे. गेल्या तीन तपांपासून जुन्या आणि दुर्मीळ मोटारींच्या प्रतिकृती संकलनाचा छंद जोपासणाऱ्या जोशी यांच्या या छंदाचे प्रदर्शन लक्ष्मीनगर येथील सह्याद्री मैदानावर भरविण्यात आले आहे. ८ नोव्हेंबरपर्यंत हे प्रदर्शन खुले राहणार आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालयातून सेवानिवृत्त झालेल्या रत्नाकर जोशी यांना १९८६ मध्ये मर्सिडीझ बेंझ या मोटारीची प्रतिकृती मिळाली आणि त्यातूनच त्यांना मोटारींच्या प्रतिकृती संकलनाचा छंद जडला. सध्या त्यांच्या संग्रहामध्ये १७५ परदेशी बनावटीच्या, तर ५० भारतीय बनावटीच्या मोटारींच्या प्रतिकृती आहेत. त्यांच्या या छंदाची लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड, एशिया बुक ऑफ रेकॉर्ड, एव्हरेस्ट बुक ऑफ रेकॉर्डने दखल घेतली आहे.

जोशी म्हणाले,' माझ्या संग्रहामध्ये १९२३ सालातील फोर्ड बनावटीच्या ट्रकपासून ते सध्याच्या बीएमडब्ल्यूपर्यंतच्या मोटारींच्या प्रतिकृती आहेत. त्यामध्ये हमर, कूपर, फेरारी, जग्वार, ऑडी या परदेशी बनावटीच्या, तसेच मारुती, हिंदुस्थान मोटर्स, महिंद्रा, टाटा बनावटीच्या मोटारींच्याही प्रतिकृती आहेत.

---

# पुण्याच्या तापमानात आणखी घट



**पुणे :** शहरामध्ये रात्रीच्या किमान तापमानात शनिवारी (२९ ऑक्टोबर) आणखी घट नोंदविण्यात आली. शहरात हंगामातील नीचांकी १३.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. तापमानात घट होत असताना तापमानाचा हंगामातील नीचांकी कायम असल्याने रात्रीच्या गारव्यात वाढ झाली आहे. त्यामुळे अगदी गेल्याच आठवड्यात रेनकोट, छत्री जवळ ठेवणाऱ्या नागरिकांना आता स्वेटर, कानटोपी बाळगावी लागत आहे. पुणे वेधशाळेने दिलेल्या अंदाजानुसार आठवडाभर थंडीची स्थिती कायम राहणार आहे. मात्र, तापमानात काही प्रमाणात चढ-उतार होण्याची शक्यता आहे. मोसमी पाऊस माघारी फिरल्याच्या दिवसापासून शहरातील तापमानात एकदमच पाच ते सहा अंशांनी घट होऊन थंडी अवतरली.

# शेर अकेला ही काफी है।

## माजी आमदार विलास लांडे यांची जोरदार मोर्चेबांधणी

**पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवडच्या राजकारणातील 'पितामह भीष्म' अशी ओळख असलेले दिग्गज नेते माजी आमदार विलास लांडे यांनी आगामी महापालिका आणि विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्वेसर्वा शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासह विरोधी पक्षनेते अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे यांच्या थेट संपर्कात राहून भोसरीसह पिंपरी-चिंचवडच्या महत्त्वपूर्ण मुद्यांवर चर्चा करीत आहेत. त्यामुळे भारतीय जनता पार्टीसमोर तगडे आव्हान निर्माण करण्याची तगडी रणनिती लांडे यांच्याकडून आखली जात आहे, यावर शिक्कामोर्तब झाले आहे.**



राज्यातील महाविकास आघाडीत फूट पडली. त्यामुळे तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकारला पायउतार व्हावे लागले. महाविकास आघाडीच्या अडीच वर्षांच्या सत्ताकाळात पिंपरी-चिंचवड महापालिकेतील तत्कालीन सत्ताधारी भाजपाला 'सळो की पळो' करुन सोडणारे माजी आमदार विलास लांडे यांच्याकडे शहर राष्ट्रवादीची धुरा मिळणार, अशी चर्चा होती. मात्र, पक्षश्रेष्ठींनी त्यांचे 'शागिर्द' असलेले माजी नगरसेवक अजित गव्हाणे यांना पसंती दर्शवली. परिणामी, शहर राष्ट्रवादीत काहीशी धुसफूस पहायला मिळाली. दरम्यान, शहर राष्ट्रवादीतील गटा-तटाच्या राजकारणाला फाटा देत माजी आमदार लांडे यांनी "कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन । मा कर्मफलहेतुर्भुर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥" या भगवद्गीतेतील विचारानुसार पिंपरी-चिंचवड आणि भोसरीच्या संपन्नतेसाठी काम करण्याची भूमिका ठेवलेली पहायला मिळत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची नुकतीच त्यांनी दिवाळीनिमित्त भेट घेतली. दिवाळीचे निमित्त असले तरी, पाटील आणि लांडे यांच्यात भोसरी तसेच पिंपरी चिंचवड शहरातील काही महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली आहे. यावेळी उद्योजक अशोक तनपुरे, उद्योजक उदय येळे, उद्योजक दत्तात्रय दिवटे उपस्थित होते. तत्पूर्वी, श्रीक्षेत्र भंडारा डोंगर येथे १२५ कोटींचे उभे राहत असलेल्या भव्य जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज मंदिर संदर्भात गोविंद बाग, बारामती येथे राष्ट्रीय नेते व राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांची भेट घेतली. यावेळी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब काशिद-पाटील आणि मंदिराच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात समाज जागृती करणारे शब्दप्रभू ह.भ.प पंकज महाराज गावडे उपस्थित होते. विशेष म्हणजे, शरद पवार यांनी मंदिराच्या उभारणीबाबत सर्व माहिती जाणून घेतली. यावेळी वारकरी शिक्षण संस्था आळंदी प्रकाशित वै. गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कृत सार्थ ज्ञानेश्वरी ग्रंथ आणि तुकाराम महाराजांच्या जीवनावरील पुस्तके देऊन पवार यांचा सन्मान केला. त्यानंतर

### प्रदेश नेतृत्वाशी संपर्क वाढवला : प्रदेशाध्यक्षांसह प्रमुख नेत्यांची महत्त्वपूर्ण चर्चा

संसदरत्न खासदार सुप्रिया यांचीही त्यांनी भेट घेतली. शहरातील सत्ताबदलानंतर काही प्रमाणात राजकीयदृष्ट्या अलिप्त राहिलेले माजी आमदार लांडे आता नव्या संकल्पासह कामाला लागले आहेत. अत्यंत शांत, संयमी आणि सावध वाटचाल करीत भाजपाचा उधळलेला अश्वरथ रोखण्यासाठी व्यूव्हरचना आखली जात आहे. शहर राष्ट्रवादीच्या संघटनात्मक पदांवरील सर्वच पदाधिकारी आमदार लांडे यांना 'ज्युनिअर' आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून मानपान आणि सन्मानाची अपेक्षा न करता पक्षहितासाठी स्वाभीमानाने लढा उभारण्याची तयारी लांडे यांनी केली आहे. २०१७ मध्ये भाजपाने 'राम-लक्ष्मण जोडी...भाजपा के दो शेर'... अशी ब्रँडिंग करीत सत्ता मिळवली होती. मात्र, आता वाऱ्याची दिशा बदलली आहे. भाजपा आव्हान देण्यासाठी राष्ट्रवादीचा 'शेर अकेला ही काफी है...' अर्थात विलास लांडे शहरातील राजकीय गणिते आजही बदलू शकतात, असा विश्वास राष्ट्रवादीतील काही जुन्या-जाणत्यांकडून व्यक्त केला जात आहे.

### संकल्प स्वच्छतेचा, सुंदर भोसरीचा...

**भोसरी विधानसभा मतदार संघाचे प्रथम आमदार असलेले विलास लांडे यांना २०१४ आणि २०१९ मध्ये पराभवाचा सामना करावा लागला. त्यापूर्वी, २००९ आणि २०१९ असे दोनदा शिरुर लोकसभा मतदार संघासाठी दंड थोपाटले होते. आता २०२४ मध्ये लांडे पुन्हा एकदा भोसरी विधानसभा मतदार संघाच्या रिंगणात दिसणार आहेत. कारण, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची भेट घेत असताना लांडे यांनी त्यांना भेटवस्तू दिली. त्यावर 'संकल्प स्वच्छतेचा, सुंदर भोसरीचा' अशा ओळी मुद्रित केल्या आहेत. त्यामुळे विद्यमान आमदार महेश लांडगे आणि लांडे यांच्यातच २०२४ ची लढत होणार हे निश्चित आहे. आमदार लांडगे विरोधी गटाची साथ आणि राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांची संघटनात्मक ताकद असे समीकरण यशस्वी करण्यासाठी आतापासूनच लांडे यांनी जुळवाजुळव सुरू केली आहे. त्यामुळे विधानसभेसाठी इच्छुक म्हणून चर्चेत असलेल्या गव्हाणे यांना २०२९ ची वाट पहावी लागेल, असे निरीक्षण राजकीय जणकारांनी नोंदवले आहे.**

### नाराजांची मोट बांधण्याची क्षमता पण...

**राज्यात सत्ता बदल झालेला असला तरी राष्ट्रवादीसह भारतीय जनता पार्टीतील नाराजांची मोट बांधण्याची पूर्ण क्षमता माजी आमदार विलास लांडे यांच्याकडे आहे. सध्यस्थितीला राष्ट्रवादी आमदार अण्णा बनसोडे गट, माजी महापौर संजोग वाघेरे गट, माजी महापौर आझमभाई पानसरे गट, माजी महापौर योगेश बहल गट असे चित्र आहे. दुसरीकडे, भाजपाचे आमदार व शहराध्यक्ष महेश लांडगे आणि आमदार लक्ष्मण जगताप यांच्यासह चिंचवड विधानसभा निवडणूक प्रभारी शंकर जगताप यांच्यावर नाराज असलेल्यांची संख्या लक्षणीय आहे. मात्र, राष्ट्रवादीकडून माजी आमदार लांडे यांना संघटनात्मक निर्णय प्रक्रियेत सहभागी करुन घेतले जात नाही. अन्यथा शहरात नाराजांची मोट बांधून राष्ट्रवादी विरोधात असतानाही सत्ता स्थापनेचा 'करिष्मा' करु शकते, असा दावा राष्ट्रवादीतील निष्ठावंत कार्यकर्त्यांकडून केला जात आहे.**

# छटपूजेच्या तयारीसाठी प्रशासनाची लगबग

## विजय गुप्ता यांची मागणी : आवश्यक सुविधा सक्षमपणे द्या

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

उत्तर भारतीय बांधवांच्या दोन दिवसीय छठ पूजा उत्सवास उद्या रविवारपासून प्रारंभ होत आहे. त्यासाठी महापालिका प्रशासनाने घाट परिसरात स्वच्छता, निर्माल्य व्यवस्था व इतर आवश्यक बाबी पुरवाव्यात, अशी मागणी हनुमान मित्र मंडळाचे अध्यक्ष तथा छठ पूजा समितीचे कार्याध्यक्ष विजय गुप्ता यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे केली होती.

> **नोकरी, उद्योग, व्यवसायानिमित्त बिहार, झारखंड, उत्तर प्रदेश येथून आलेले नागरीक पिंपरी चिंचवड शहरात अनेक वर्षांपासून वास्तव्यास आहेत. हे उत्तर भारतीय बांधव दरवर्षी शहरात विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात छट उत्सव साजरा करतात. चिंचवडगावातील पवना नदीच्या घाटावर हनुमान मित्र मंडळाच्या वतीने हा उत्सव साजरा केला जातो.**
>
> **- विजय गुप्ता, कार्याध्यक्ष, छठ पूजा समिती.**

त्या मागणीची दखल घेत महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी चिंचवड गावातील पवना नदीवरील घाटास प्रत्यक्ष भेट देत कामांचा आढावा घेतला. त्यावेळी पालिकेचे अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, प्रभाग अधिकारी, छठ पूजा समितीचे कार्याध्यक्ष विजय गुप्ता, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते खंडूशेठ चिंचवडे, शशिकांत श्रीवास्तव, जे जे गुप्ता, मुन्ना गुप्ता, दुर्लमप्रसाद गुप्ता, मदनरमई प्रसाद गुप्ता, मनीष लक्ष्मण गुप्ता व आदी उपस्थित होते.

रविवारी (दि. ३०) आणि सोमवारी (दि. ३१) रोजी मोठ्या प्रमाणात छट उत्सव साजरा करण्यात येणार आहे. गतवर्षीप्रमाणे या वर्षी देखील पवना नदीच्या घाटावर भव्य गंगा आरती आणि पूजा, भजन, छट लोकगीत असे विविध धार्मिक, सामाजिक प्रबोधनात्मक कार्यक्रम सादर करण्यात येणार आहेत. या धार्मिक उत्सवात नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन विजय गुप्ता यांनी केले आहे.



## संपादकीय

# महाराष्ट्राचे औद्योगिक-आर्थिक नुकसान

***राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार आणि महामंडळांवरील नेमणुकाबाबत तर्कवितर्क लढविले जात असतानाच 'एअरबस-टाटा' या २२ हजार कोटी रुपयांच्या संयुक्त प्रकल्पाने राज्याची सीमा ओलांडून गुजरात जवळ केल्याने विरोधकांनी राज्य सरकारला घेरले आहे.***

वेदान्त-फॉक्सकॉन प्रकल्प महाराष्ट्राच्या हातून गेल्याच्या वेदनेची तगमग अद्याप शमलेली नसतानाच राज्याला हा आणखी एक धक्का बसला आहे. कोकणातला बल्क ड्रग प्रकल्प रद्द झाला आहे, की होणार आहे याबाबत भाजप आणि उद्योगमंत्री उदय सामंत हे संभ्रमात असल्याचे दिसत असतानाच आता हा प्रकल्पही निसटल्याचे स्पष्ट झाल्याने राजकीय वातावरण तापले आहे. लागोपाठ दुसरी संधी मिळाल्यावर विरोधकांच्या टीकेची धार तीव्र होणे साहजिकच असले, तरी भाजपचे नेते आणि राज्याचे उद्योगमंत्री करीत असलेल्या खुलाश्यांमध्येही गोंधळ आणि विरोधाभास दिसत आहे, त्यामुळे या संदर्भातील सर्व घडामोडी अद्याप बाहेर आलेल्या नसाव्यात, असे दिसते. या प्रकल्पाबाबतचे सत्य काय आणि गुजरातकडे सध्या गुंतवणुकीची रीघ का लागलेली आहे, हे स्पष्ट व्हायचे तेव्हा होईल, परंतु या 'खेचाखेचीत' महाराष्ट्राचे औद्योगिक-आर्थिक नुकसान होत आहे हे नाकारता येत नाही. गुजरातमध्ये या वर्षअखेरीस विधानसभा निवडणूक आहे, त्यामुळे अशा गुंतवणुकीची 'रेवडी' देऊन मतदारांना खुश करण्याचा हा एक प्रयत्न आहे, असे म्हणण्यास आधार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या गृहराज्यात भाजपला यशाची खात्री दिसत नाही, असाही याचा एक अर्थ होतो. भाजपच्याच युक्त्या वापरुन शह देऊ पाहणाऱ्या अरविंद केजरीवाल यांच्या 'आप'ला पाठिंबा मिळत असल्याचे सांगितले जाते ते खरे असावे, असा याचा दुसरा अर्थ होतो. खरे तर भाजप असो किंवा कोणताही पक्ष असो, पाच वर्षे सत्ता राबवल्यावर त्यांना जनतेपुढे त्या पाच वर्षाचा हिशेब द्यावा लागतो. सत्ताधाऱ्यांविरुद्धचा रोष व्यक्त होण्याची शक्यता अशा वेळी खूपच असते. हा रोष आणि 'आप' मुसंडी मारण्याची शक्यता अशा दोन्ही कारणांनी मोठमोठे प्रकल्प राज्यात नेऊन तेथील मतदारांच्या 'उद्योगस्नेही' मानसिकतेला चुचकारण्याचा हा प्रयत्न असू शकतो. केंद्रात सत्ता असताना आपल्या गृहराज्यात पराभव होऊ नये, यासाठीची धडपड करताना आता भाजपचाच उपमुख्यमंत्री असलेल्या महाराष्ट्रातील गुंतवणूकीवर मात्र गदा आणली जात आहे. वेदान्त-फॉक्सकॉन प्रकल्प अंतीमतः गुजरातकडे गेला तेव्हा महाविकास आघाडीच्या सरकारने त्यांच्या कार्यकाळात तो प्रकल्प राज्यात राहावा म्हणून काहीच हालचाल केली नाही, प्रतिसाद दिला नाही असा आताच्या सरकारने केलेला आरोप तर्कशुद्ध होता.




## आनंदी सकाळ

### अंतःकरण दुर्गुणांपासून स्वच्छ करावे

आपले ध्येय काय असावे हे ठरविण्याची बुद्धी माणसाला आहे, ती खालच्या प्राण्यांना नाही. हाच माणसात आणि त्या प्राण्यांत फरक आहे. प्राण्यांना प्रारब्धाने आलेले भोग भोगावे लागतात, त्याचप्रमाणे माणसालादेखील आलेले भोग भोगावे लागतात, पण भगवंताचा पाठिंबा ज्याला आहे तो मागेपुढे सोयीने भोग भोगू शकतो. जगातल्या घडामोडी जशा चालतात, तशाच आपल्याही सर्व गोष्टी प्रारब्धाने चालतात. आपण जे मिळविले आहे ते स्वतःच्या प्रयत्नाने मिळाले, ही कल्पना गेल्याशिवाय देह प्रारब्धावर टाकता येणार नाही. 'माझे सर्व हे त्याच्या कृतीचे फळ आहे,' असे म्हटले तर क्रिया तर चालते, पण कर्तेपण राहात नाही. पुष्कळ गोष्टी अशा आहेत की, त्यांच्याकडे बोट दाखवून त्यांचे कारण अमुक असे आपण सांगू शकतो, पण काही गोष्टी अशा आहेत की, त्यांचे कारण आपल्याला दाखविता येत नाही. अशा वेळी, त्या प्रारब्धाने घडल्या असे आपण म्हणतो.

# महासत्तेचा 'बौद्धिक' महामार्ग






डॉलरच्या तुलनेत रुपयाची होणारी घसरण, भूक निर्देशांकातील देशाचे १०७ वे स्थान अशा बातम्यांच्या पार्श्वभूमीवर काही सकारात्मक वाचायला मिळाले, की आपण जगाच्या मुख्य प्रवाहापासून अगदीच भरकटलेलो नाही, याची जाणीव होते. ती बातमी म्हणजे जागतिक बौद्धिक संपदा संघटनेच्या अहवालात भारताने नवोन्मेषात घेतलेली मोठी आघाडी. गेल्या सात वर्षांत आपण ८१ वरून ४० व्या स्थानावर झेप घेतली आहे.या यादीत स्वित्झर्लंड अव्वल असून अमेरिका, युनायटेड किंग्डम हे देशही आघाडीवर आहेत. भारताने घेतलेली झेप मात्र अनन्यसाधारण मानावी लागेल. २०१९ साली ५२ व्या स्थानावर असलेला आपला देश करोना काळातही उत्तम कामगिरी करून गेला. अतिशय नियोजनबद्ध रीतीने आपण बौद्धिक संपदेच्या क्षेत्रात काम करत आहोत आणि हे सकारात्मक पद्धतीने हळुहळू सुधारणारे स्थान हे याचेच फलित आहे. बेंगळुरू, दिल्ली,चेन्नई आणि पुणे ही शहरे या नवोन्मेषाच्या नकाशावर ठळकपणे आढळतात. आता २५ व्या स्थानावर पोहोचण्याचे उद्दिष्ट असून त्या दृष्टीने सर्वांनीच प्रयत्न करायला हवेत.

जमीनजुमला, सोनेनाणे, इमारती, कारखाने म्हणजेच संपत्ती /संपदा अशी एकेकाळी आपली धारणा होती. मेक इन इंडिया, स्टार्ट अप, डिजिटल इंडिया, अटल इनोव्हेशन मिशन,स्किल इंडिया अशा अनेक योजनांमुळे बुद्धिमत्ता, सर्जनशीलता, उद्योजकता, संशोधनवृत्ती, पठडीपेक्षा वेगळ्या पद्धतीने एखाद्या समस्येकडे पाहण्याची दृष्टी हीसुद्धा संपत्ती आहे आणि देशाच्या प्रगतीसाठी ती महत्वाची आहे, हे हळूहळू अधोरेखित होऊ लागले आहे. बौद्धिक संपदा,पेटंट्स याला विद्यापीठाच्या कामगिरीत श्रेयांक दिले जातात त्यामुळे उच्च शिक्षण क्षेत्रात याविषयी जागरूकता आली असली तरी सर्वसामान्य नागरिकांमध्ये याचा म्हणावा तसा बोलबाला आजही नाही. याचा प्रसार-प्रचार नीट झाला तर बौद्धिक संपदेच्या क्षेत्रात उत्तुंग कामगिरी आपल्याला अवघड नाही.

डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी हळदीसाठी दिलेला लढा जगभर गाजला, तेव्हा पेटंट हा शब्द मोठ्या प्रमाणात चर्चेत आला. अमेरिकेसारख्या बलाढ्य देशालाही आपण हळदीच्या लढ्यात गुणवत्तेवर हरवले. राइसटेक नावाच्या कंपनीने बासमतीसारखा तांदूळ असे पेटंट त्यांच्या तांदळाला अमेरिकेत मिळवले होते .त्यावेळी जीआय(जिओग्राफिकल इंडिकेटर) म्हणजे भौगोलिक निर्देशांक ही संकल्पना आपल्याकडे प्रचलित नव्हती. त्यामुळे जीआय संरक्षण आपल्याला मिळालेले नव्हते.

# मौज हवी; जबाबदारी नको

**उत्साह आणि अतिउत्साह यांतला फरक समजून घ्यायचाच नाही, असे जणू अनेकांनी ठरवूनच टाकले असावे, अशी अवस्था दिवाळीत राज्यातील सर्वच प्रमुख शहरांची झाली होती.**

**दाट** वस्ती, मोठमोठ्या इमारती यांमुळे धूर विरळ होण्यास लागणारा उशीर आणि बंदिस्त जागेत फटाके फोडू नयेत या साध्या, सर्वसामान्य संकेताचाही पडलेला विसर यामुळे दिवाळीचे तीन-चार दिवस अनेकांना मनस्ताप झाला. मोठ्या संख्येने लोकांना खोकल्याने हैराण केले आणि विविध ठिकाणी लागलेल्या आगींमुळे मालमत्तेचेही मोठे नुकसान झाले. 'सण उत्साहाने साजरा करा' अशा शुभेच्छा राज्यकर्त्यांनी दिल्या होत्या, त्याचा अर्थ 'तुम्ही अगदी निर्धास्त होऊन इतरांना त्रास द्या' असा होत नाही. मात्र गणेशोत्सवापासूनच सण-समारंभ उत्साहाने साजरे करण्याची शासनाने दिलेली मोकळीक आणि प्रोत्साहन यांच्या गैरवापराचा कळस झाल्याचे दिवाळीच्या चार दिवसांत दिसून आले. ध्वनिप्रदूषणाच्या आणि वातावरण प्रदूषणाच्या पातळीत कमालीची वाढ होण्यास हातभार लावणाऱ्यांमध्ये दुर्दैवाने लहानांसोबत मोठ्यांचाही सहभाग असल्याचे अनेक



ठिकाणी पाहावयास मिळत होते. समाज म्हणून प्रदूषणाच्या धोक्यांबाबतचे भान अजूनही आपल्याला येत नाही हे खरोखरच दुर्दैवाचे आहे.

करोनाचा कहर ओसरल्यावर जनतेला निर्बंधमुक्त वातावरणाचा आनंद लुटू द्यावा, दोन वर्षांच्या सामाजिक बंदिवासातून झालेल्या सुटकेनंतर मोकळा श्वास घेऊ द्यावा यासाठी शासनाने गणेशोत्सवापासूनच सोहळे साजरे करण्यास प्रोत्साहन दिले होते. खुद्द 'सरकार'मध्येही 'सुटका झाल्याची' भावना प्रबळ होती त्यामुळे यंत्रणांनाही फार ताणून न धरण्याच्या सूचना 'अनधिकृत'पणे दिल्या गेल्या असाव्यात. त्यामुळे मंडपांनी रस्ता व्यापण्यापासून तर दांडियाने घड्याळाच्या काट्यांकडे दुर्लक्ष करण्यापर्यंत अनेक प्रकार सुरू होते. त्यातून सामान्य नागरिकांची अडचण झाली तर कोणी त्यावर फारसे भाष्य करत नव्हते. मात्र दिवाळी येता येता 'उत्सव बहु झाले' अशी अनेकाची अवस्था झाली आणि फटाक्याच्या धुरांनी आसमंत भरून गेला, अस्थमा, दमा असलेल्या रूग्णांचे श्वास कोंडू लागले तेंव्हा हा 'अतिउत्साह' किती तापदायक आहे हे दिसू लागले. दिवाळीच्या दिवसांतल्या 'सोमवारी' दिल्ली हे जगातील सर्वाधिक प्रदूषित हवेचे शहर ठरले. मुंबई आणि इतर अनेक शहरांची अवस्थाही फार वेगळी नव्हती. अगदी दिवाळी संपल्यानंतरचा गुरुवार विचारात घेतला तरी त्या दिवशीही दिल्ली आणि मुंबई या शहरांमधील हवेतील प्रदूषणाची पातळी 'घातक' आणि 'अतिघातक' याच श्रेणींत मोडणारी होती. न्यायालयाने रात्री १०.३० नंतर 'आवाज' नको असे जे म्हटले आहे ते केवळ सार्वजनिक सभा-समारंभांपुरते मर्यादित नाही.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।  
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥  
नव्हे आराणुक लौकिकापासून ।  
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ‘उद्योगमंत्र्याचा राजीनामा घेणार का मुख्यमंत्री?’

## आदित्य ठाकरेंच्या टीकेला उदय सामंतांनी दिलं प्रत्युत्तर; म्हणाले “किती खोटं बोलायचं…”

**।मुंबई ।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

वेदान्त-फॉक्सकॉन आणि टाटा एअरबस हे दोन मोठे प्रकल्प महाराष्ट्रातून गुजरातला गेल्यानंतर राज्यातील राजकारण चांगलेच तापले आहे. यावरून विरोधक आणि सत्ताधारी यांच्यात आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडण्यात येत आहेत. दरम्यान आज या मुद्द्यावरून आदित्य ठाकरे आणि माजी उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी पत्रकार परिषद घेत शिंदे सरकारवर टीका केली होती. राज्यातील प्रकल्प बाहेर जात असताना मुख्यमंत्री उद्योगमंत्र्यांचा राजीनामा घेतील का? असे ते म्हणाले होते. या टीकेला उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज पत्रकार परिषद घेत प्रत्युत्तर दिले आहे. काय म्हणाले उदय सामंत?



”मी काल पत्रकार परिषद घेऊन टाटा एअरबसबरोबर तत्कालिन सरकारने जो पत्रव्यवहार केला असेल किंवा बोलणी झाली असेल त्याचा तपशील जाहीर करावा, अशी विनंती केली होती. माझ्या विनंतीला मान देऊन माजी उद्योगमंत्री आणि आमदार आदित्य ठाकरे आज काही कागदपत्रं जाहीर करतील, असं वाटलं होतं. मात्र, आज मीच काही कागदपत्र घेऊन महाराष्ट्राच्या जनतेपुढे आलो आहे”, अशी प्रतिक्रिया उदय सामंत यांनी दिली आहे.

”मिहानमध्ये टाटाची एक कंपनी कार्यरत आहे. त्या कंपनीच्या अधिकाऱ्यांनी २०२० मध्ये पुढाकार घेऊन एअरबससाठी लागणारी जागा मिहानमध्ये मिळेल का? अशा पद्धतीची चौकशी केली होती. त्यानंतर हा प्रकल्प महाराष्ट्रात यावा, यासाठी कोणताही प्रयत्न तत्कालिन राज्य सरकारकडून झाला नाही. याउलट विरोधीपक्ष नेते असताना देवेंद्र फडणवीस यांनी हा प्रकल्प मिहानमध्ये येण्यासाठी प्रयत्न केला होते. मात्र, राज्य सरकारकडून कोणताही प्रतिसाद देण्यात आला नाही. त्यामुळे सरकार गेल्यानंतर त्यांना राग असू शकतो. मात्र, राग असला तरी किती खोटं बोलायचं याला काही मर्यादा असतात, असे प्रत्युत्तर उदय सामंत यांनी दिले आहे. एअरबसच्या हा प्रकल्प नागपूरच्या मिहानमध्ये होणार, असा कोणताही निर्णय झाला नव्हता”, असेही ते म्हणाले. ”तत्कालिन महाविकास आघाडी सरकारच्या काळात ७२ एमओयू करण्यात आले होते. मात्र, ते कागदावरच राहिले. त्यासाठी कोणतीही कॅबिनेट बैठक घेण्यात आली नाही. मात्र, आम्ही तीन महिन्यात १० कंपन्यांसाठी कॅबिनेट बैठक घेऊन २५ हजार ३६८ कोटी रुपयांच्या प्रकल्पांना मान्यता दिली”, अशी माहितीही त्यांनी दिली.

”बल्क ड्रग्जच्या बाबतीतही जे आरोप करण्यात आले, ते खोटे आहेत. हा प्रकल्प आम्ही रायगडमध्येच करतो आहे. एमआयडीसीच्या माध्यमातून हे प्रकल्प उभारण्यात येत आहे”, असं स्पष्टीकरणही त्यांनी दिले.

> ”ऑरीक सिटीच्याबाबतीतही आज जे आरोप आदित्य ठाकरे यांनी केले, ते खोटे आहेत. या सिटीपासून ९०० मीटरवर समृद्ध महामार्ग आहे. गेल्या अडीच वर्षांपासून तिथे लोक सांगत आहेत की, हा ९०० मीटरचा रस्ता करा. मात्र, त्याकडे कोणालाही लक्ष द्यायला वेळ मिळाला नाही. पण आम्ही तो रस्ता मंजूर केला. हा प्रकल्पही राज्यातून गेला नाही. फक्त केंद्र सरकारकडून जो निधी येणार होता. तो अद्यापर्यंत आलेला नाही. आम्ही त्यासाठी पाठपुरावा करू. मात्र, येथे होणारा मेडीकल डिव्हाईस प्रकल्पही तिथेच होईल”.
> **- उदय सामंत, उद्योगमंत्री**

# १४ हजार ९५६ जागांसाठी होणारी पोलीस भरती पुढे ढकलली

## पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये निराशा

**।मुंबई । महाईन्यूज ।**

करोना विषाणूच्या संसर्गामुळे मागील तीन वर्षांपासून महाराष्ट्रात पोलीस भरती प्रक्रिया राबवण्यात आली नाही. त्यामुळे पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये निराशा आहे. असं असताना अलीकडेच सरकारने नोव्हेंबरपासून पोलीस भरती प्रक्रिया सुरू करणार असल्याची घोषणा केली होती. मात्र, या घोषणेनंतर सरकारने लगेच यू-टर्न घेतला आहे. नोव्हेंबरमध्ये होणारी पोलीस भरती पुढे ढकलण्यात आली आहे. प्रशासकीय कारणास्तव ही भरती पुढे ढकलल्याची माहिती मिळत आहे.

खरं तर, राज्य पोलीस मुख्यालयाकडून एकूण १४ हजार ९५६ जागांसाठी पोलीस भरती जाहीर करण्यात आली होती. पण प्रशासकीय कारणास्तव ही भरती पुढे ढकलण्यात आली. ही भरती प्रक्रिया तात्पुरती स्थगित करण्यात आल्याची माहिती मिळत आहे. संबंधित भरतीबाबतचा निर्णय पुढील आठवड्यात होण्याची



शक्यता आहे. पोलीस भरतीबरोबर राज्य राखीव दलातील पोलीस शिपाई भरतीही पुढे ढकलण्यात आली आहे.

खरं तर, महाराष्ट्र पोलीस भरतीसाठी ३ नोव्हेंबरला अर्ज भरायला सुरुवात होणार होती. पण या भरती प्रक्रियेला स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा त्यांचा पुन्हा हिरमोड झाला. आज पोलीस महासंचालक कार्यालयाकडून एक प्रसिद्धपत्रक जारी करण्यात आलं आहे. त्यामध्ये प्रशासकीय कारणास्तव पोलीस भरती प्रक्रिया स्थगित करण्यात येत असल्याचं म्हटलं आहे. तसेच पोलीस भरतीची नवी जाहिरात लवकर जाहीर करण्यात येईल, असंही प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

खरं तर, महाराष्ट्र पोलीस भरतीसाठी ३ नोव्हेंबरला अर्ज भरायला सुरुवात होणार होती. पण या भरती प्रक्रियेला स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा त्यांचा पुन्हा हिरमोड झाला. आज पोलीस महासंचालक कार्यालयाकडून एक प्रसिद्धपत्रक जारी करण्यात आलं आहे. त्यामध्ये प्रशासकीय कारणास्तव पोलीस भरती प्रक्रिया स्थगित करण्यात येत असल्याचं म्हटलं आहे. तसेच पोलीस भरतीची नवी जाहिरात लवकर जाहीर करण्यात येईल, असंही प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

# टाटा एअरबस प्रकल्पही गुजरातेत गेल्याने राष्ट्रवादीचे ‘ भीक माँगो ‘ आंदोलन

**।सोलापूर । महाईन्यूज ।**

वेदांतासारख्या मोठ्या प्रकल्पापाठोपाठ टाटा एअरबस प्रकल्पही महाराष्ट्रातून गुजरातला हलवला गेल्याने महाराष्ट्र सरकारच्या विरोधात सोलापुरात राष्ट्रवादी काँग्रेस उद्योग व व्यापार सेलच्यावतीने ‘ भीक माँगो ‘ आंदोलन करण्यात आले.नव्या पेठेत राजवाडे चौकातील भाजपचे आमदार विजय देशमुख यांच्या संपर्क कार्यालयापासून ‘ भीक माँगो ‘ आंदोलनास सुरूवात करण्यात आली, यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली.



नवी पेठेत अनेक व्यापाऱ्यांच्या दुकानांमध्ये जाऊन प्रतिकात्मक स्वरूपात भीक मागून आंदोलन करण्यात आले. दोन्ही प्रकल्प एका पाठोपाठ एक गुजरातमध्ये हलविण्यात आल्यामुळे महाराष्ट्रातील युवकांना भीक मागायची वेळ शिंदे व फडणवीस सरकारने आणली असल्याचा आरोप प्रदेश राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष प्रशांत बाबर आणि उद्योग व व्यापार सेलचे अध्यक्ष संपन्न दिवाकर यांनी केला. या आंदोलनात ज्योतिबा गुंड, निशांत साळवे, बंटी यमपुरे, गणेश छत्रबंद, श्रावण ढवळगी, शुभम यमपुरे आदी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# जतजवळ ऊसतोड मजूरांचा ट्रक पलटी; १५ जण जखमी

**सांगली :** जवळील जतमध्ये एका ऊस तोडणी मजुरांना घेऊन जाणारा ट्रक पलटी होऊन अपघात झाला आहे. ट्रक चालकाने अचानक ब्रेक दाबल्याने गाडी पलटी होऊन पंधरा ऊसतोड मजूर हे जखमी झाले. जखमीमध्ये काही मुलांचे देखील समावेश असून जखमींना मिरजेच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अपघातग्रस्त ऊसतोड मजूर बीड आणि जालना जिल्ह्यातील असून जत मार्गे ते कर्नाटक मधल्या बेळगी साखर कारखान्याकडे निघाले होते. जतमधून काही अंतरावर गाडी पोहोचली असता, चालकाने अचानक वाहनाचा ब्रेक दाबला. त्यामुळे वाहन रस्त्याच्या कडेला जाऊन पलटी झाले. त्यामध्ये गाडीमध्ये बसलेले १५ ऊसतोड मजूर जखमी झाले. सुदैवाने कोणत्याही प्रकारची जीवितहानी झालेली नाही, मात्र अपघातामध्ये ट्रकचे आणि ऊसतोड मजुरांच्या साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे.

# जलविद्युत प्रकल्पात भीषण अपघात!

## भूस्खलनात 4 जणांचा मृत्यू, अनेक जखमी

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

जम्मू-काश्मीरच्या किश्तवाडमधील द्राबशाला भागातील रॅटले हायड्रो पॉवर प्रकल्पात भीषण अपघात झाला असून, भूस्खलनात जेसीबी चालकासह चार जणांचा मृत्यू झाल्याचे सांगितले जात आहे. तर, नऊ जण जखमी झाले आहेत. घटनास्थळी मदत आणि बचाव कार्य युद्ध पातळीवर सुरू करण्यात आले असून, काहीजण अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. अपघातातील मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. याबाबत नेटवर्क १८ ने वृत्त प्रकाशित केले आहे.



**जलविद्युत प्रकल्पासाठी काम सुरू असताना हा अपघात झाल्याचे सांगितले जात आहे. त्यावेळी अचानक भूस्खलन झाले यात जेसीबीचालकाचा मृत्यू झाला. तर, इतर कामगार जखमी झाले. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या पाच जणांची बचाव पथकाकडून सुटका करण्यात आली असून, जखमी व्यक्तींना उपचारासाठी दोडा रुग्णालयात पाठवण्यात आले आहे.**

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, या जलविद्युत प्रकल्पासाठी काम सुरू असताना हा अपघात झाल्याचे सांगितले जात आहे. त्यावेळी अचानक भूस्खलन झाले यात जेसीबीचालकाचा मृत्यू झाला. तर, इतर कामगार जखमी झाले. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या पाच जणांचा बचाव पथकाकडून सुटका करण्यात आली असून, जखमी व्यक्तींना उपचारासाठी दोडा रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. हा जलविद्युत प्रकल्प 1000 मेगाबाइटचा असून, पाच महिन्यांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते याचे उद्घाटन करण्यात आले होते.

# बिहारमध्ये शॉर्टसर्किट, सिलिंडरचा स्फोट

## भीषण आगीत 30 जण होरपळले

। मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

बिहारमधील औरंगाबाद जिल्ह्यात शॉर्टसर्किटमुळे भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. या शॉर्टसर्किटनंतर गॅस सिलिंडरचाही स्फोट झाल्यामुळे ही आग जास्तच पसरली. या आगीत जवळपास ३० जण होरपळले असून यातील १० जण गंभीर जखमी झालेच्या म्हटले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार बिहारमधील औरंगाबाद जिल्ह्यामध्ये सुरुवातील शॉर्टसर्किट आणि नंतर सिलिंडरचा स्फोट झाल्यामुळे येथे भीषण आग लागल्याची घटना घडली. छट पूजेसाठी येथे एका घरात स्वयंपाक करण्यात येत होता. मात्र यावेळी अचानकपणे शॉर्टसर्किट झाल्यामुळे भीषण आग लागली. त्यानंतर या आगीत गॅस सिलिंडरचाही स्फोट झाला. परिणामी आगीने उग्र रुप धारण केले. या घटनेत साधारण ३० जण होरपळल्याचे म्हटले जात आहे. यातील १० जणांची प्रकृती गंभीर आहे. आगीच्या भक्ष्यस्थानी सापडलेल्या नागरिकांना वाचवण्याचा प्रयत्न करणारे ७ पोलीसदेखील या आगीत जखमी झाले आहेत. आगीच्या घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशामक दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी पाणी टाकून आग विझविण्याचा प्रयत्न केला. तसेच जखमी नागरिकांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. काही जखमींवर औरंगाबादमधील सादार रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर काही जखमींवर खासगी रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत. शॉर्टसर्किट आणि सिलिंडरच्या स्फोटामुळे ही आग लागल्याचे म्हटले जात असले तरी, पोलिसांनी त्याची अद्याप पुष्टी केलेली नाही.

# चीनमध्ये कोरोनाचा हाहाकार!

## सामूहिक चाचणीचे आदेश, घरातून बाहेर न पडण्याचा फतवा

। शांघाय । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

ज्या देशातून कोरोनाचा) प्रसार झाला होता, तो देश पुन्हा एकदा कोरोनाच्या विळख्यात अडकला आहे. यावेळेस कोरोनाची व्यापाराची राजधानी असलेल्या शांघायमध्ये कोरोनाने धुमाकूळ माजवला असून सरकारने कोणालाही घराबाहेर न पडण्याचे आदेश दिले आहेत. तसंच, शांघायमधील यांगपू जिल्ह्यातील १३ लाख लोकांना कोरोना चाचणी करण्याचे आदेश दिले आहेत. ही चाचणी होत नाही, तोवर घराबाहेर न पडण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

अडीच कोटी लोकसंख्या अशलेल्या शहराची स्थानिक अर्थव्यवस्था कोरोनाच्या संसर्गामुळे कोलमडून पडली आहे. गेल्या लॉकडाऊनमध्ये शहरात अन्नधान्याचे संकट निर्माण झाले होते आणि लोक आणि अधिकारी यांच्यात अनेक भांडण झाले होते.

चीनमध्ये वुहानपासून उत्तर पश्चिम शहरात कोरोनाच्या रुग्णांत पुन्हा वाढ होत आहे. त्यामुळे तेथेही लॉकडाऊन लावण्यात आला आहे. झिरो कोविड पॉलिसीमुळे, जिथे कोरोनाची प्रकरणे समोर येत आहेत, अशा क्षेत्रांनाही सील करण्यात आले आहे. चीनमध्ये गेल्या 24 तासांत सलग तिसऱ्या दिवशी कोरोनाचे 1000 हून अधिक नवीन रुग्ण आढळले आहेत. चीनमध्ये निर्बंध कायम राहण्याची चिन्हे दिसत आहेत आणि शांघाय Huanpu नदीतील एका बेटावर कायमस्वरूपी कोरोना केंद्र तयार करण्याच्या योजनेवर काम करत आहे, असे तेथील स्थानिक मासिक KaiChin मध्ये म्हटलं आहे. या केंद्रात 3,009 स्वतंत्र खोल्या आणि 3250 बेड असतील आणि त्याचे बांधकाम सहा महिन्यांत पूर्ण होईल, अशी माहितीही या मासिकात देण्यात आली आहे.



**अडीच कोटी लोकसंख्या अशलेल्या शहराची स्थानिक अर्थव्यवस्था कोरोनाच्या संसर्गामुळे कोलमडून पडली आहे. गेल्या लॉकडाऊनमध्ये शहरात अन्नधान्याचे संकट निर्माण झाले होते आणि लोक आणि अधिकारी यांच्यात अनेक भांडण झाले होते. चीनमध्ये वुहानपासून उत्तर पश्चिम शहरात कोरोनाच्या रुग्णांत पुन्हा वाढ होत आहे. त्यामुळे तेथेही लॉकडाऊन लावण्यात आला आहे. झिरो कोविड पॉलिसीमुळे, जिथे कोरोनाची प्रकरणे समोर येत आहेत, अशा क्षेत्रांनाही सील करण्यात आले आहे. चीनमध्ये गेल्या 24 तासांत सलग तिसऱ्या दिवशी कोरोनाचे 1000 हून अधिक नवीन रुग्ण आढळले आहेत.**

# गुजरातमध्ये लागू होणार समान नागरी कायदा? समिती स्थापनेबाबत घोषणेची शक्यता

। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

गुजरात निवडणुकीपूर्वी भाजप सरकार राज्यात समान नागरी कायदा (UCC) लागू करण्याची घोषणा करणार आहे. याबाबत गृह राज्यमंत्री हर्ष सिंघवी आज दुपारी घोषणा करण्याची शक्यता आहे. सुत्रांच्या माहितीनुसार, गुजरातमध्ये सरकार समान नागरी कायदा लागू करण्यासाठी एक समिती स्थापन करेल. याबाबत प्रस्ताव शनिवारी मंत्रिमंडळात येऊ शकतो, उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश UCC वरील या समितीचे अध्यक्ष असतील.



### समान नागरी संहितेचा भाजपच्या अजेंड्यात समावेश

**2019 च्या लोकसभा निवडणुकीतही भाजपने आपल्या जाहीरनाम्यात समान नागरी संहितेचा समावेश केला होता. हा एक मुद्दा आहे जो नेहमीच चर्चेत असतो. समान नागरी संहिता लागू झाल्यावरच लैंगिक समानता येईल, असा भाजपचा विश्वास आहे.**

स्थापन करण्याचा प्रस्ताव आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडला जाऊ शकतो. गुजरातचे गृहमंत्री दुपारी ३ वाजता पत्रकार परिषद घेणार आहेत. ते याबाबत घोषणा करू शकतात, असे मानले जात आहे. याआधी भाजपने उत्तराखंड विधानसभा निवडणुकीच्या वेळी समान नागरी संहिता लागू करण्याची घोषणा केली होती, जी सरकार स्थापन झाल्यावर लागू करण्यात आली होती. समान नागरी संहिता म्हणजे सर्व नागरिकांसाठी समान नियम. म्हणजेच भारतात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकासाठी, धर्म किंवा जातीचा विचार न करता समान कायदा असेल. त्याच्या अंमलबजावणीवर, हाच कायदा विवाह, घटस्फोट, जमीन मालमत्तेच्या वितरणात लागू होईल, जो सर्व धर्माच्या लोकांना पाळणे बंधनकारक असेल.

# जीगरवाली बाई क्षिती जोग !



यापूर्वी क्षिती जोग आपल्याला 'झिम्मा' चित्रपटात दिसली मिता जहांगिरदार ही व्यक्तिरेखा साकारणारी क्षिती यात थोडी गोंधळलेली, घाबरट अशी दिसली. मितावर प्रेक्षकांनी भरभरून प्रेम केले. आता या भूमिकेच्या अगदी विरूद्ध अशी 'सनी'मधील तिची भूमिका आहे आणि ही भूमिकाही तिच्या चाहत्यांना नक्कीच आवडेल.

बिनधास्त, आत्मविश्वासू, स्पष्टवक्ती अशी वैदेही 'सनी'मधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. वैदेहीची भूमिका क्षिती जोग साकारणार असून यात तीला जीगरवाली बाई असे म्हणण्यात आले आहे.

कॅफे मालक असलेली वैदेही सनीसोबत कधी कठोर वागताना दिसत आहे, तर कधी त्याची काळजीही घेताना दिसत आहे. सनी आणि वैदेहीमध्ये कामासोबतच भावनिक नातं निर्माण झाल्याचेही दिसतेय. त्यांच्या नात्यातील नेमकी गंमत 'सनी' पाहिल्यावरच उलगडेल. दरम्यान या दोघांमधील केमिस्ट्री पडद्यावर उत्तम दिसत आहे. क्षिती जोग आणि ललित प्रभाकरने नाटक आणि मालिकेमध्ये एकत्र काम केले आहे. 'सनी'च्या निमित्ताने क्षिती आणि ललित आता चित्रपटातही एकत्र दिसणार आहेत.

क्रेझी फ्यु फिल्म्स, प्लॅनेट मराठी, क्रिएटिव्ह वाईब प्रॉडक्शन प्रस्तुत, चलचित्र कंपनी निर्मित 'सनी' हा सिनेमा १८ नोव्हेंबरला चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. हेमंत ढोमे दिग्दर्शित, इरावती कर्णिक लिखित या चित्रपटात ललित प्रभाकर, क्षिती जोग यांच्यासह चिन्मय मांडलेकर यांचीही प्रमुख भूमिका आहे. अक्षय विलास बर्दापूरकर, क्षिती जोग, विराज गवस व उर्फी काझमी हे सिनेमाचे निर्माते असून संतोष खेर, तेजस्विनी पंडित सह-निर्माते आहेत.

# दीपिका-रणवीरच्या लोकप्रिय गाण्यांवर कोरियन्सही थिरकले



कोरियातील एका कार्यक्रमाचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसत आहे. बॉलिवूड गाण्यांचं वेड फक्त भारतीयांनाच नाही तर परदेशातील लोकांनाही आहे. अनेकदा परदेशातील सेलिब्रेटीही भारतीय संगीत आणि बॉलिवूडच्या हिट गाण्यांचं कौतुक करताना दिसतात. अगदी हॉलिवूडला बॉलिवूडच्या गाण्यांनी ठेका धरायला लावला आहे आणि आता यात कोरियन लोकांचीही भर पडली आहे. कोरियातील एका कार्यक्रमाचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसत आहे. ज्यात ते बॉलिवूडच्या गाण्यांवर धम्माल डान्स करताना दिसत आहेत.

सोशल मीडियावर एक व्हिडीओ व्हायरल होताना दिसत आहे. जो कोरियातील 'फॉरेनर थँक्सगिव्हिंग ग्रँड फेस्टिवल'चा आहे. पण हा व्हिडीओ व्हायरल होण्याचं कारण आहे बॉलिवूडची गाणी. या व्हिडीओमध्ये काही कोरियन परफॉर्मर्स रणवीर सिंग आण दीपिका पदुकोण यांच्या 'राम लीला' चित्रपटातील लोकप्रिय गाण्यांवर धम्माल डान्स करताना दिसत आहेत. या व्हिडीओमध्ये हे लोक 'राम लीला'मधील गरबा सॉन्ग आणि रणवीर सिंगवर चित्रित झालेलं, 'रामजी की चाल देखो' या गाण्यांवर डान्स करत आहेत. तर प्रेक्षकाही हा डान्स खूप एन्जॉय करताना दिसत आहे. प्रेक्षकांमधून टाळ्या, शिट्ट्या आणि उत्स्फुर्तपणे चिअर केल्याचा आवाज ऐकू येत आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या या व्हिडीओवर अनेक भारतीयांनी कमेंट्स केल्या आहेत.

दरम्यान भारतीयांमध्ये कोरियन ड्रामाचं बरंच वेड पाहायला मिळतं. पण आता कोरियामध्ये भारतीय संगीताची अशाप्रकारे क्रेज असल्याचं पाहून चाहते खुश झाले आहे. अनेकांनी या व्हिडीओवर कमेंट करताना हे पाहून भारतीय असल्याचा अभिमान वाटतो असं लिहिलं आहे. फार कमी वेळात या व्हिडीओवर लाइक्स आणि कमेंट्सचा अक्षरशः पाऊस पडला आहे.



## अभिनेत्री मयूरी वाघ 'एकवीरा देवीच्या' भूमिकेत

मराठी मालिका विश्वातील अभिनेत्री मयुरी वाघ हीने नेहमीच विविध भूमिका साकारत प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. दरम्यान मयुरी वाघ ही पुन्हा एकदा छोट्या पडद्यावरून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. यावेळी मयुरी वाघ (MAYURI WAGH) एका आगळ्या वेगळ्या भूमिकेत दिसणार आहे. मयुरी वाघ एकविरा देवीच्या भूमिकेत दिसणार आहे.

नेहमी भक्तांच्या पाठीशी असणारी देवी एकवीरा, भक्तांना त्यांचा संकटातून कशी तारून नेते, हे पाहणे उत्सुकतेचे असेल. 'आशीर्वाद तुझा एकवीरा आई' (ASHIRWAD TUJHA EKVIRA AAI)या नव्या मालिकेतून एकविरा देवीच्या भूमिकेत मयुरी वाघ दिसणारा आहे. सोनी मराठीवर ही मलिका प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. दरम्यान या मालिकेचा पहिला प्रोमो प्रेक्षकांचा भेटीला आला असून त्यात एकवीरा आईच्या भूमिकेतील मयूरी वाघ प्रेक्षकांना पाहायला दिसणार आहे. छोट्या पडद्यावर अनेक विविध विषयांच्या मालिका प्रेक्षकांच्या भेटीला येत असतात. त्यामध्ये आता अजून एका मालिकेची भर पडणार आहे. मयूरी वाघ आई एकवीराची भूमिका कशी साकारते, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. मयूरी वाढ व्यतिरिक्त या मालिकेत अमृता पवारही छोट्या पडद्यावर पुन्हा दिसणार आहे. प्रेक्षकसुद्धा ही मालिका पाहण्यासाठी उत्सुक आहेत.

## अमृता सुभाषने दिली गोड बातमी; चाहत्यांनी दिल्या शुभेच्छा

मराठमोळी अभिनेत्री अमृता सुभाषने आपल्या अभिनयाची छाप फक्त मराठी चित्रपटांमध्येच नाही तर बॉलिवूडमध्येही उमटवली आहे. अलीकडे अमृता वारंवार तिच्या चित्रपटांमुळे तसेच वेब सीरीजमुळे चर्चेत असते. दरम्यान, अमृता आता पुन्हा एकदा आणखी एका कारणामुळे चर्चेत आली आहे. नुकतीच एक पोस्ट अमृताने तिच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर शेअर केली आहे. ज्यामध्ये तिने एक आनंदाची बातमी शेअर केली आहे. अमृताने तिच्या सोशल मीडिया अकाऊंटवरुन ती लवकरत आई होणार असल्याची माहिती दिली आहे. ही बातमी कळताच चाहत्यांसह अनेक सहकलाकार अमृताचं कौतुक करु लागले आहेत. अमृताने तिच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर प्रेग्नंसी टेस्ट केलेला एक फोटो शेअर केला आहे. यामध्ये प्रेग्नंसी टेस्ट पॉझिटिव्ह असलेली स्ट्रीप दिसत आहे. या फोटोखाली अमृताने कॅप्शन देखील दिलं आहे. ज्यामध्ये तिने लिहिलंय की,"एका आश्चर्याची सुरुवात झाली", ही बातमी वाचून सर्वचजण खूश झाले. मात्र, खाली दिलेले पूर्ण कॅप्शन वाचल्यावर अनेकांचा हिरमोड झाला. कारण यामध्ये अमृताने लिहिलंय की, "मी नाही...तर वंडर वुमेनमधील जया प्रेग्नेंट आहे. तुम्ही मला ज्या शुभेच्छा दिल्या त्या जयाला सुद्धा द्या."



## लग्न न करता तुला मूल झालं तरी चालेल.. जया बच्चन यांचा नातीला अजब सल्ला!



बॉलीवूडच्या ज्येष्ठ अभिनेत्री महानायक अमिताभ बच्चन यांच्या पत्नी जया बच्चन या त्यांच्या रागीट स्वभावामुळे अनेकांना माहिती आहे. राज्यसभेत देखील त्यांच्या शीघ्रकोपीपणाचा अनुभव कित्येकांनी घेतला आहे. त्यामुळे त्यांच्याशी कुणी बोलायला आणि फोटो घेण्यासाठी तर कुणी जात नसल्याचे दिसून आले आहे. जया बच्चन जेव्हा एखाद्या कार्यक्रमाला जातात त्यावेळी चाहते त्यांच्यासोबत फोटो घेण्यासाठी नेहमीच तत्पर असतात. मात्र ही गोष्ट जया बच्चन यांना आवडत नाही. त्यावरुन कायमच त्यांच्या रागाचा पारा चढलेला दिसतो. आज मात्र त्या त्यांच्या रागामुळे नाही तर त्यांच्या विधानामुळे चर्चेत आल्या आहेत. जया यांनी त्यांच्या मुलीसह, श्वेता बच्चन नंदासह 'व्हॉट द हेल नव्या' या पॉडकास्ट चॅनलला भेट दिली होती. विशेष म्हणजे हे चॅनल त्यांची नात नव्या नवेली नंदाने सुरु केले

## थँक गॉड'च्या कमाईत घसरण; प्रदर्शनाच्या तिसऱ्या दिवशी कमावले केवळ 18 कोटी




बॉलिवूड अभिनेता अजय देवगण आणि अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा यांचा 'थँक गॉड' चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर संघर्ष करताना दिसत आहे. दिवाळीच्या काळात हा चित्रपट प्रदर्शित झाला. चित्रपट प्रदर्शित होऊन तीन दिवस झाले असूनही बॉक्स ऑफिसवर चित्रपटाने फारशी कमाई केली नाही. बॉक्स ऑफिस इंडियाच्या रिपोर्टनुसार, अजय देवगण आणि सिद्धार्थ मल्होत्रा यांचा 'थँक गॉड' चित्रपटाने आत्तापर्यंत जवळपास 18 कोटींची कमाई केली आहे. बॉक्स ऑफिसच कलेक्शन पाहून 'थँक गॉड'चे निर्मात्यांसाठी समस्या निर्माण झाली आहे. 'थँक गॉड' चित्रपटाने आत्तापर्यंत एकूण 18.10 कोटींची कमाई केली आहे. तसेच या चित्रपटाने प्रदर्शनाच्या पहिल्या दिवशी 8.10 कोटींची कमाई केली. तर प्रदर्शनाच्या दुसऱ्या दिवशी 6 कोटींची कमाई केली होती.

## शॉर्ट न्यूज »

### आशियाई यूथ ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेत भाग्यश्री पाटील विजेती



**। जळगाव। महाईन्यूज**

बाली (इंडोनेशिया) येथे सुरू असलेल्या आशियाई यूथ ब्लिट्झ (अतिजलद) बुध्दिबळ स्पर्धेत जळगावची भाग्यश्री पाटील हिने विजेतेपद मिळविले. या स्पर्धा ब्लिट्झ (अतिजलद) स्वीस लीग पद्धतीने घेण्यात आल्या. त्यात इंडियन ऑइलची भाग्यश्री पाटील हिने सात फेऱ्यांअखेर सहा विजय आणि एक पराभव, असे सहा गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला. याअगोदरही रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम आणि क्लासिक स्पर्धेत पाचवा क्रमांक तिने मिळविला. असे भारताला दोन सुवर्णपदके मिळवून देण्याची कामगिरी केली. भाग्यश्रीने गुयेन थी खंड व्हॅन (व्हिएतनाम), बल्बयेवा शेनिया (कझाकस्तान), रिंधिया व्ही. (भारत), वू बुई थी थान वान (व्हिएतनाम), वुओंग की अंह (व्हिएतनाम), कलिउविआन सिसिलिया नातलिए (इंडोनेशिया) यांना पराभूत केले.

# फिलिप्स- बोल्टसमोर आशिया चषक विजेते पुन्हा अपयशी!

## न्यूझीलंडचा श्रीलंकेवर 65 धावांनी विजय

**मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था**



आयसीसी टी२० विश्वचषक २०२२ मध्ये आज न्यूझीलंड आणि श्रीलंका यांच्यात ग्रुप ए मधील सामना झाला. त्यात न्युझीलंडने श्रीलंकेवर ६५ धावांनी विजय मिळवत उपांत्य फेरीतील स्थान जवळपास पक्के करण्याच्या दिशेने एक पाऊल टाकले आहे. सिडनीमध्ये नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडच्या संघाने सात गडी गमावून १६७ धावा केल्या. किवी संघासाठी चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या ग्लेन फिलिप्सने १०४ धावांची धडाकेबाज खेळी करत संघाला सन्मानजनक धावसंख्येपर्यंत पोहचवले. फिलिप्सला त्याच्या शतकी खेळीसाठी सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.

ग्लेन फिलिप्सने आपल्या टी२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट कारकिर्दीतील दुसरे शतक झळकावले. फिलिप्सशिवाय डॅरिल मिशेल हा किवी संघाकडून सर्वाधिक धावा करणारा दुसरा खेळाडू होता. पाचव्या क्रमांकावर फलंदाजी करताना मिचेलने २४ चेंडूत २२ धावांची महत्त्वपूर्ण खेळी खेळली. ग्लेन फिलिप्सने ६४ चेंडूत १०४ धावांची तुफानी खेळी केली. त्याला वानिंदू हसरंगाच्या गोलंदाजीवर एक जीवदानही मिळाले आणि तोच सोडलेला झेल आज श्रीलंकेला महागात पडला. धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या श्रीलंका संघाला ग्लेन फिलिप्सने केलेल्या धावांइतक्या देखील धावा संपूर्ण संघाला करता आल्या नाहीत. अवघ्या १०१ धावांवर संपूर्ण संघ धावबाद झाला. श्रीलंकेची सुरुवात अतिशय खराब झाली. टीम साऊदी व ट्रेंट बोल्टने ३.३ षटकात केवळ ८ धावांवर श्रीलंकेचे चार फलंदाज तंबूत पाठवले. २४ धावांपर्यंत श्रीलंकेचा अर्धा संघ बाद झालेला. यानंतर भानुका राजपक्षे याने काही मोठे फटके खेळत २२ चेंडूवर ३४ धावा काढल्या. मात्र, इतर फलंदाज फारसे योगदान देऊ शकले नाहीत.

# स्पॅनिश टेनिसपटू राफेल नदाल पॅरिस मास्टर्स टेनिस स्पर्धेच्या माध्यमातून कोर्टवर पुन्हा परतणार

**। ओडेन्से। महाईन्यूज । वृत्तसंस्था**



स्पेनचा महान टेनिसपटू राफेल नदाल पुढील आठवड्यात होणाऱ्या पॅरिस मास्टर्स टेनिस स्पर्धेतून कोर्टवर परतणार आहे. त्याचे प्रशिक्षक कार्लोस मोया यांनी वरील माहिती दिली. दुखापतींसह नदालने यंदाचे १४वे फ्रेंच ओपन विजेतेपद जिंकले आणि पोटाच्या समस्येमुळे तो विम्बल्डनमधून बाहेर पडला. नदालने सप्टेंबरमध्ये सांगितले होते की त्याला खेळातील काही गोष्टी दुरुस्त करण्याची गरज आहे म्हणून तो पुन्हा कधी खेळेल याची चाहत्यांना खात्री वाटत नव्हती. विक्रमी २२ ग्रँडस्लॅम जेतेपदे जिंकणाऱ्या नदालने विम्बल्डनमधून माघार घेण्यापूर्वी गेल्या महिन्यात लेव्हर चषकात दुहेरीच्या सामन्यात रॉजर फेडररसोबत सामना खेळला होता. त्याने ८ ऑक्टोबर रोजी पत्नी मेरी पेरेलोसोबत आपल्या पहिल्या मुलाच्या जन्मासाठी सुट्टी घेतली होती.

पॅरिस मास्टर्सनं शुक्रवारी पॅलेस ऑम्निस्पोर्ट्स डी पॅरिस-बर्सी येथे ३१ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या २०२२ स्पर्धेचा ड्रॉ जाहीर केला. दरम्यान, वेळा ग्रँडस्लॅम विजेतेपद पटकावणारा स्पेनचा राफेल नदाल या स्पर्धेतून पुनरागमन करणार आहे. यूएस ओपनमधून बाहेर पडल्यानंतर स्पर्धात्मक टेनिसमधील ही त्याची पहिलीच स्पर्धा असेल. या ड्रॉमध्ये नोवाक जोकोविच देखील असेल, ज्यानं या महिन्याच्या सुरुवातीला दोन विजेतेपदे जिंकली आहेत. सध्याच्या जागतिक क्रमवारीत स्पेनचा टेनिसपटू कार्लोस अल्काराझ अव्वल स्थानी आहे. यूएस खुल्या टेनिस स्पर्धेच्या टॉप-१६ फेरीत फ्रान्सिस टियाफोकडून पराभूत झाल्यानंतर, त्याने सांगितले की त्याला "खेळातील काही चुका सुधारायच्या आहेत त्यामुळे तो थोडा वेळ खेळातून विश्रांती घेणार आहे." मानसिक स्थिती सुधारण्यासाठी देखील हे आवश्यक आहे. फ्रेंच ओपनच्या पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात जागतिक स्पेनच्या राफेल नदालनं जागतिक क्रमवारीत ८ क्रमांकाच्या नॉर्वेजियन कॅस्पर रुडचा पराभव केला.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही